# महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग
## राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय

डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड पुणे – ४११ ००१

सत्यमेव जयते | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य पुणे -१

संकेतस्थळ : arogya.maharashtra.gov.in
कार्यालय : ०२० - २६०५९५३०
नानोप विभाग : ०२० – २६०५८२९२
इ- मेल : crsmccd@gmail.com

**आरोग्य सेवा** | जा.क्र.आमाजीआ/कक्ष ८४ /एमसीसीडी/ 8347-92 /२२
दिनांक - 27/०५/२०२२

प्रति,
मुख्याधिकारी,
तथा निबंधक जन्म मृत्यू,
नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत .सर्व......

विषय : मृत्युच्या कारणाचे वैद्यकीय प्रमाणपत्राबाबत.

संदर्भ : १) मा. सर्वोच्च न्यायालय आदेश ३० जून २०२१-**(Writ Petition (Civil) No. 539 and 554 of 2021.)**
२) मा. महानिबंधक, जन्म मृत्यू, नवी दिल्ली कार्यालयाचे परिपत्रक **No.8/2/2017 – VS (MCCD) dt 03.09.2021**
३) राज्यस्तरीय अंतरविभागीय समन्वय समितीच्या दि. १७.१०.२०१९ रोजीच्या बैठकीतील मृत्यूच्या कारणाचे वैद्यकीय प्रमाणपत्रांच्या संख्या वाढवण्याबाबतच्या सुचना.
४) अधिसुचना महाराष्ट्र शासन राज्यपत्र भाग चार - ब एप्रिल१९-२५,२०१८ दि. १२.०४.२०१८.
५) या कार्यालयाचे पत्र जाक्र.स(आमाजीआ)/**MCCD** कक्ष-८४/एमसीसीडी प्रमाणपत्र/नपा/ नप/६९२९-७४/२२ दिनांक: २७.०४.२०२२.

संदर्भ क्र. १ व २ अन्वये आपले कार्यक्षेत्रात कोविड-१९ या आजाराने मृत पावलेल्या व्यक्तिचे मृत्युच्या कारणांचे वैद्यकीय प्रमाणिकरण (एम.सी.सी.डी.) प्रमाणपत्राची एक प्रत आपले कार्यालयात / आरोग्य संस्थेमध्ये जतन करावी व मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी मागितल्यास त्वरीत उपलब्ध करुन द्यावी. तसेच मृत्यू नोंद वहीमधील संबंधित मृत व्यक्तीच्या शेरा रकान्यात MCCD प्रमाणपत्र हस्तांतर केलेल्या नातेवाईकाचे नाव व तसेच मृत्यू नोंद हस्तांतराचा दिनांक नोंदवावा

संदर्भ क्रं.३ च्या बैठकीमध्ये ग्रामीण (गाव) भागातून एम.सी.सी.डी. प्रमाणपत्राचे संकलन अत्यल्प असल्याचे निर्देशनास आले असुन सदर भागात एम.सी.सी.डी. प्रमाणपत्राचे संकलन वाढवण्याबाबत सुचना दिल्या आहेत

एम.सी.सी.डी. हि योजना केंद्रशासनाच्या जन्म मृत्यू अधिनियम १९६९ च्या कलम १०(२) व १०(३) अन्वये देशात अंमलात आली आहे. **सदर अधिनियम १९६९ च्या ७(१) अधिन राहून संदर्भ क्रं. ४ च्या अधिसुचनेद्वारे राज्य शासनाच्या सेवेतील सर्व वैद्यकीय अधिकारी यांना निबंधक, जन्म मृत्यू म्हणून प्राधिकृत करण्यात आले आहे.**

(कृ.मा.प)